



# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर






वर्ष ३० वे | अंक १३४ | पाने ४ | किंमत २ रूपये | सोमवार १४ सप्टेंबर २०२६ | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 | पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५



'लालबागचा राजा' ची आकर्षक 'श्री' ची मुर्ती

# लष्कर-ए-तोयबाशी संबंधीतास अटक

## मुंबई गुन्हे शाखेची कारवाई;पाचगणीजवळील गोडवली गावातून घेतले ताब्यात

**पाचगणी/प्रतिनिधी:-**

पर्यटननगरी पाचगणी व परिसरात एकच खळबळ उडवून देणारी घटना समोर आली आहे. मुंबईतील एका बड्या व्यावसायिकाला आंतरराष्ट्रीय क्रमांकावरून आलेल्या धमकीच्या प्रकरणाचा छडा लावताना, पाचगणीजवळील गोडवली गावातून 'लष्कर-ए-तोयबा' या दहशतवादी संघटनेशी संशयित संबंध असलेल्या एका व्यक्तीला मुंबई गुन्हे शाखेच्या गुन्हे गुप्तचर पथकाने (सीआययू) गुरुवारी नाट्यमयरित्या ताब्यात घेतले. मोहम्मद शफीक मोहम्मद अकबर लोन (वय ३९, मूळ रा. जम्मू-काश्मीर, सध्या रा. गोडवली, ता. महाबळेश्वर) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे.

### दोन मोबाइल, डायरी जप्त

मुंबई गुन्हे शाखेने लोनकडून दोन मोबाइल फोन आणि एक डायरी जप्त केली आहे. मोबाइलमधून हटविण्यात आलेला मजकूर, संदेश, संपर्क क्रमांक आणि अन्य डिजिटल माहिती पुनर्प्राप्त करण्यासाठी तांत्रिक तज्ज्ञांची मदत घेतली जात आहे. या डिजिटल तपासातून धमकी प्रकरणातील संपर्कांचे धागेदोरे, आर्थिक व्यवहार आणि अन्य संशयित व्यक्तींची माहिती मिळण्याची शक्यता आहे.

### पाकिस्तानातील कमांडरशी थेट कनेक्शन

तपासादरम्यान अत्यंत धक्कादायक माहिती समोर आली आहे. संशयित शफीक लोन याचे वडील आणि दोन मोठे भाऊ पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील मुझफ्फराबाद येथे राहत असल्याचे निष्पन्न झाले आहे. यातील त्याचा एक भाऊ २०१९ मध्ये पाकिस्तानात गेला असून तो सध्या 'लष्कर-ए-तोयबा' या बंदी घातलेल्या दहशतवादी संघटनेत कमांडर पदावर कार्यरत आहे. तसेच शफीक हा पाकिस्तानातील 'फैयाज काश्मिरी' नावाच्या व्यक्तीच्या थेट संपर्कात असल्याचे सामाजिक माध्यमांवरील संवादावरून उघडकीस आले आहे. व्यावसायिकाला आलेले धमकीचे संदेश आणि फोन कॉल हे शफीकच्या मोबाईलशी थेट जोडलेले असल्याचे सबळ पुरावे तपास यंत्रणांच्या हाती लागले आहेत.



मुंबईतील वांद्रे (पूर्व) परिसरातील एका अनधिकृत मशिदीच्या पाडकामाबाबत प्रशासनाला पाठिंबा दिल्याचा राग मनात धरून, प्रसिद्ध व्यावसायिक इम्तियाज खत्री यांना २१ मेपासून आंतरराष्ट्रीय व्हॉट्सप क्रमांकांवरून सातत्याने धमक्या येत होत्या. याबाबत खत्री यांनी २२ जून रोजी पोलिसांत रीतसर तक्रार दाखल केली होती. या गंभीर प्रकरणाचा तपास करत असताना मुंबई गुन्हे शाखेला तांत्रिक विश्लेषणावरून पाचगणीतील गोडवली येथील धागेधोरे सापडले.

गेल्या काही काळापासून शफीक लोन हा पाचगणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील गोडवली येथील 'रॉयल पॅलेस' या खाजगी बंगल्यात केअरटेकर/कामगार म्हणून काम करत होता. शांत व निसर्गरम्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पाचगणी परिसराचा आसरा घेऊन तो आपल्या संशयित कारवाया चालवत असल्याचा संशय आहे. गुरुवारी मुंबई गुन्हे गुप्तचर पथकाने अचानक छापा टाकून त्याला राहत्या ठिकाणाहून ताब्यात घेतले. त्याच्या ताब्यातून दोन महागडे मोबाईल आणि एक महत्त्वाकांक्षी डायरी जप्त करण्यात आली असल्याचे समजत आहे. मोबाईलमधील हटवलेला (डिलिट केलेला) मजकूर आणि डिजिटल डेटा पुनर्प्राप्त करण्यासाठी न्यायवैद्यक (फॉरेन्सिक) व तांत्रिक तज्ज्ञांची मदत घेतली जात आहे.

**महाबळेश्वर तालुक्यातील पाचगणी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ३९ वर्षीय मोहम्मद शफीक मोहम्मद अकबर लोन याला मुंबई पोलिसांनी चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. मुंबई गुन्हे शाखेचे गुन्हे गुप्तचर पथक या प्रकरणाची पुढील सखोल चौकशी करत असल्याची माहिती पोलीस यंत्रणेकडून समजत आहे .**

### 'फैयाज काश्मिरी'च्या संपर्कात?

लोनचा 'फैयाज काश्मिरी' नावाच्या पाकिस्तानी व्यक्तीशी समाजमाध्यमांवर संपर्क असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले. याशिवाय काही संशयास्पद आर्थिक व्यवहारांची माहितीही तपास यंत्रणेस मिळाली आहे. त्यामुळे केवळ धमकीचे फोन कोणी केले, यापुरता तपास मर्यादित न राहता या संपर्कांच्या माध्यमातून आणखी कोणती साखळी कार्यरत होती का, याचा शोध घेतला जात आहे.

शांतताप्रिय आणि पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या महाबळेश्वर-पाचगणी परिसरात आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटनेशी संबंधित धागेधोरे सापडल्याने संपूर्ण सातारा जिल्ह्यात आणि पोलीस वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली आहे. संशयित शफीकला पुढील सखोल चौकशीसाठी आणि देशविरोधी नेटवर्कचा पर्दाफाश करण्यासाठी मुंबईला नेण्यात आले आहे. या प्रकरणाचे मूळ किती खोलवर पसरले आहे आणि यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा कसून तपास सुरू आहे.

# 'श्री'च्या आगमनासाठी जिल्हा सज्ज

## गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात घरगुती गणेश मूर्तींचे आगमन

**सातारा/प्रतिनिधी:-**

**गणरायाच्या आगमनासाठी जिल्हा सज्ज झाला असून सार्वजनिक गणेश मंडळांनी आपली तयारी पूर्ण केली आहे. आज आपल्या लाडक्या बाप्पाचे आगमन करण्यासाठी ढोल-ताश्याचा गजर आणि आकर्षक अशा काही मिरवणूका पार पडतील तर याचबरोबर घरगुती गणपतींचे आगमन होईल. गणरायाच्या आगमनावेळी कोणताही अनुचित प्रकार घडूनये म्हणून जिल्ह्यात पोलीस यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे.**

गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच शाहूनगरी सातारा गणेशोत्सवाच्या जल्लोषात न्हाऊन निघाली आहे. गणेशोत्सवाच्या पूर्वसंध्येला शहरातील प्रमुख बाजारपेठा, चौक आणि रस्ते गणेशभक्तांच्या गर्दीने फुलून गेले. मोती चौक ते पाचशे एक पाटी तसेच मोती चौक ते देवी चौक परिसरात दिवसभर नागरिकांची मोठी गर्दी राहिल्याने वाहतूक सुरळीत ठेवताना पोलिसांची चांगलीच दमछाक झाली. दरम्यान, सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या गणरायांच्या आगमन मिरवणुकांनी शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण केले.

गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी साताऱ्यातील विविध गणेशोत्सव मंडळांनी भव्य मंडप, आकर्षक देखावे आणि विद्युत रोषणाईची जय्यत तयारी केली आहे. मानाचे गणपती तसेच विविध मंडळांच्या गणरायांच्या आगमनाची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, शहरातील प्रमुख चौक आणि रस्ते सजावटीने उजळून निघाले आहेत. राजवाडा परिसर, मोती चौक आणि पोवई नाका परिसरातील बाजारपेठांमध्ये गणेशमूर्ती, पूजेचे साहित्य, फुले, सजावटीच्या वस्तू आणि मोदकांच्या खरेदीसाठी नागरिकांची झुंबड उडाली.

### डीजेऐवजी पारंपरिक वाद्यांना पसंती

ध्वनीवर्धक यंत्रणांसाठी पोलिसांनी ७२ डेसिबलची मर्यादा घालून दिली आहे. डीजेच्या दणदणाटावर निर्बंध असल्याने अनेक मंडळांनी ढोल-ताशा, लेझीम आणि पारंपरिक वाद्यांना प्राधान्य दिले आहे. त्यामुळे गणरायाच्या आगमन मिरवणुकांमध्ये पारंपरिक संस्कृतीचा बाज अधिक ठळकपणे पाहायला मिळाला.

यंदाचा गणेशोत्सव १२ दिवसांचा असल्याने गणेशभक्तांमध्ये विशेष उत्साह दिसून येत आहे. गणरायाच्या स्वागतासाठी मंडळांमध्येही मोठी तयारी सुरू असून, पारंपरिक वाद्यांना यंदा विशेष पसंती मिळताना दिसत आहे. ढोल-ताशा, लेझीम पथकांच्या तालावर गणरायाचे स्वागत करण्याकडे अनेक मंडळांचा कल असल्याचे आगमन मिरवणुकांवरून स्पष्ट झाले.


सातारा येथे गणेशाचे साहित्य खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत मोठी गर्दी झाल्याचे छायाचित्रात दिसत आहे.

### २९०० पोलिसांचा बंदोबस्त

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात सुमारे २९०० पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सातारा शहरात गर्दीचे नियोजन, वाहतूक नियंत्रण, मंडळांच्या मिरवणुका आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांनी विशेष नियोजन केले आहे. प्रमुख चौकांमध्ये पोलिस कर्मचारी तैनात असून, वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी दिवसभर पोलिसांची धावपळ सुरू होती.


गणरायाच्या आगमनाच्या पूर्वसंध्येला शनिवारी कराडची बाजारपेठ खरेदीसाठी झालेली गर्दी, रंगीबेरंगी सजावट आणि गणेशभक्तांच्या उत्साहाने फुलून गेली होती. (छाया : अस्लम मुल्ला, कराड)

# लाडक्या गणरायाचे आज आगमन

## स्वागतासाठी कराडची बाजारपेठ गजबजली;खरेदीसाठी गणेशभक्तांची मोठी गर्दी

**कराड/प्रतिनिधी:-**

लाडक्या गणरायाच्या आगमनाची चाहूल लागताच कराड शहरातील बाजारपेठेला रविवारी उत्सवी स्वरूप आले. गणेशमूर्तींच्या प्रतिष्ठापनेपासून घराच्या सजावटीपर्यंतची तयारी अंतिम टप्प्यात आल्याने सकाळपासूनच बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची वर्दळ वाढली. दुपारनंतर गर्दीचा ओघ आणखी वाढत गेला आणि 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषात शहर अक्षरशः गणेशमय झाले.

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील गणेश मंडळांकडून मंडप व सजावटीची तयारी पूर्ण करण्यात आली आहे. त्याचबरोबर घरगुती गणपतीच्या स्वागतासाठीही नागरिकांनी आकर्षक सजावटी केल्या आहेत. गणरायाच्या आगमनाच्या पूर्वसंध्येला पूजासाहित्य, फुले, हार, तोरणे, मखर तसेच विद्युत रोषणाईच्या वस्तूंच्या खरेदीसाठी प्रमुख बाजारपेठांमध्ये दिवसभर लगबग सुरू होती.

घरगुती गणेशोत्सवाची सजावट यंदा अधिक आकर्षक करण्याकडे नागरिकांचा कल दिसून आला. मखर, फुलांच्या व मोत्यांच्या माळा, रंगीबेरंगी

पान ४ वर


गेणेशोत्सवाच्या पार्श्वभूमिवर कराड शहरातून आज पोलीसांनी रूट मार्च काढला. छाया-अस्लम मुल्ला

# माझ्या एकट्याच्या सहीने मराठा आरक्षण मिळणार नाही

**सातारा/प्रतिनिधी:-**

मराठा समाजाला आरक्षण देण्याबाबत राज्य सरकारची भूमिका १०० टक्के सकारात्मक आहे. मात्र, 'माझ्या एकट्याच्या सहीने आरक्षण मिळणार नाही,' असे स्पष्ट करत सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी आरक्षणाचा निर्णय भावनिकतेच्या नव्हे,



तर कायदेशीर व घटनात्मक कसोटीवर टिकणारा असणे आवश्यक असल्याचे सांगितले.

पान ४ वर

### स्वागत विघ्नहरे..

विघ्ने ये विघ्नामागे
विघ्न हरा विघ्नहरे
शिव सुता गौरीपुत्रा
तुझीचंआम्ही लेकरे
परिस्थिती जितवले
टळला यम फास रे
तरी शांती हरविलो
सदैव मृत्यू भास रे
महाभारत लिही तू
कथन करी व्यास रे
पुन्हा युध्दे चालली
पुरे बाआता बास रे
महोत्सव सोहळे ते
सगे सोयरे ही विसरे
अंतरात स्थापी तुझं
स्थान ना दुजे दुसरे
कोल्हेकुई असह्य ही
भ्याली तुझीचं वासरे
पिडले कधी दुष्काळे
त्रस्त व्यस्त महा पुरे
आधार समर्थगणेशा
संकटा करे-हास रे
दूर व्हावे मळभ सारे
लयीत चालो श्वास रे
आगतम् सुस्वागतम्
जळीस्थळी तू वावरे
गोंधळले मात्र विश्वरे
मनुजा वेळीच सावरे

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# २०२९ पूर्वी समान नागरी कायदा लागू करणार

**मुंबई/प्रतिनिधी:-**

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले, आम्ही अनेक राज्यांमध्ये समान नागरी कायदा लागू केला आहे. मला खात्री आहे की, २०२९ पूर्वी भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएची सत्ता असलेल्या सर्व २१ राज्यांमध्ये आम्ही समान नागरी कायदा लागू करू. सर्जिकल स्ट्राइक, एअर स्ट्राइक आणि 'ऑपरेशन सिंदूर' यांसारख्या मोहिमांमुळे दहशतवादाबाबत 'झिरो टॉलरन्स'चे धोरण प्रस्थापित झाले आहे, तसेच विविध क्षेत्रांमध्ये सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे, असा पुन्नरुच्चारही शहा यांनी केला.

जेन 'झी''च्या नेतृत्वाखालील आंदोलनाचे सामाजिक आणि राजकीय परिणामबाबत बोलताना केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले, आपण लोकशाहीत आहोत. विविध



मुद्द्यांवर लोकांची मते भिन्न असू शकतात आणि ती मते मांडली जाणे आवश्यक आहे. भारतीय जनता पक्ष सत्तेवर आहे, पण आम्ही आणीबाणी लादून राज्यकारभार करू शकत नाही. ती काँग्रेसची संस्कृती आहे, आमची नाही. आमचा संवाद आणि चर्चेवर विश्वास आहे, असेही अमित शहा यांनी यावेळी सांगितले.

यावेळी भाजप आणि एनडीए हा देश आणि जनतेसाठी कटिबद्ध असल्याचे सांगताना, १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या काळात सेवा अभियान राबविणार असल्याची माहिती देण्यात आली. भाजप आणि एनडीए ही एकाच ध्येयाने काम करणारी व्यवस्था आहे. देशात घुसखोरी करणाऱ्यांना शोधून देशाबाहेर काढणार असा स्पष्ट इशारा गृहमंत्री शहा यांनी दिला असून, देशातील माओवादाचा पूर्ण खात्मा करून देशाला माओवादापासून मुक्त केले असल्याचे त्यांनी सांगितले.


### मातृभाषेला प्राधान्य देणे हे सरकारचे धोरण

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा म्हणाले, मातृभाषेला प्राधान्य देणे हे आमच्या सरकारचे धोरण आहे आणि संविधानानेही यासंदर्भात राज्यांना विशिष्ट निर्देश दिले आहेत. मला वाटत नाही की हा काही मोठा मुद्दा बनेल. काही व्यक्तींनी तणाव निर्माण करण्याचा प्रयत्न केल्यास क्वचित प्रसंगी काही घटना घडू शकतात, परंतु राज्यांकडे अनुभवी नेतृत्व आहे आणि अशा समस्या सोडवण्याचा मार्ग ते नक्कीच शोधून काढतील.

# मुंबई पोलिसांनी आझाद मैदानात आंदोलनाला परवानगी नाकारली

**मुंबई/प्रतिनिधी:-**

मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईत आंदोलन करण्याच्या मनसुब्यांना मुंबई पोलिसांनी मोठा झटका दिला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण करण्यासाठी पोलिसांकडे परवानगी मागितली होती. आपण सर्व अटी-शर्तींचे पालन करु, असेही त्यांनी सांगितले होते. तसे हमीपत्रही मनोज जरांगे यांनी पोलिसांना दिले होते. मात्र, आझाद मैदान पोलिसांनी १९ सप्टेंबरच्या मनोज जरांगे पाटील यांच्या उपोषणाला परवानगी नाकारली आहे. दक्षिण मुंबईतील सामान्य व्यवहार जसे शाळा, रुग्णालय, व्यवसाय, न्यायपालिका, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, सार्वजनिक आरोग्य बाधित होऊन सार्वजनिक सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याने आझाद मैदान येथे आमरण उपोषण व आंदोलन करण्यास मागितलेली परवानगी नाकारत असल्याचे आझाद मैदान पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजू



बिडकर यांनी पत्रात म्हटले आहे. आता पोलिसांकडून मनोज जरांगे यांना नोटीस पाठवून आंदोलन न करण्याबाबत बजावण्यात येईल.

गेल्यावेळी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन केलं होते, मुंबईची परिस्थिती काय झाली होती, कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता, याचा पोलिसांकडून दाखला देण्यात आला आहे. त्यावेळी सीएसएमटी परिसर असेल किंवा महानगरपालिका मार्ग वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला होता. त्यामुळे नागरिकांची प्रचंड गैरसोय झाली होती. मोठ्याप्रमाणात मराठा आंदोलक रस्त्यावर उतरले होते. परिणामी कायदा सुव्यस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. गेल्यावेळी मुंबई पोलिसांनी अटी शर्तीसह परवानगी दिली होती. आझाद मैदानात ५००० बांधव जमतील, अशी अट होती. मात्र, त्यापेक्षा अधिक लोक जमले होते. हाच दाखला देऊन मुंबई पोलिसांनी मनोज जरांगेंच्या या आंदोलनाला परवानगी नाकारल्याचे समजते.

# साताऱ्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम उभारणार

## ना.शिवेंद्रसिंहराजे ;प्रस्तावित जागेची केली पाहणी

**सातारा/प्रतिनिधी:-**

सातारा शहरासह जिल्ह्यात क्रिकेटचे खेळाडू मोठ्या संख्येने तयार होत आहेत. या खेळाडूंसाठी तसेच राज्य, राष्ट्रीय स्तरासह रणजी सामने साताऱ्यात खेळले जावेत आणि हे सामने पाहण्याचा आनंद सातारकरांना घेता यावा, यादृष्टीने सातारा शहरात आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम उभारण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत, असे राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी स्पष्ट केले.

सातारा शहरातील ठक्कर सिटीच्या लगत आयुर्वेदिक गार्डन शेजारी सातारा नगर परिषदेच्या मालकीची सुमारे ११ एकर जागा असून या जागेमध्ये सर्व सोयी सुविधांनी युक्त सुसज्ज आणि प्रशस्त असे क्रिकेट स्टेडियम उभारण्याची मागणी जिल्हा क्रिकेटप्रेमींनी ना. शिवेंद्रसिंहराजे यांना होती. त्यांच्या मागणीला ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला असून आज त्यांनी प्रत्यक्ष जागेची पाहणी केली. याप्रसंगी सातारा जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष राजू भोसले, पालिकेचे नगराध्यक्ष अमोल मोहिते, नगरसेवक अविनाश कदम, जयंत महाजनी, इर्शाद बागवान, निशांत गवळी, धैर्यशील भोसले, पिंटू साळुंखे, भालचंद्र निकम यांच्यासह पदाधिकारी व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

सातारा शहरात एक दर्जेदार



क्रिकेट स्टेडियम असावे, यादृष्टीने आपले प्रयत्न सुरु असून त्याचसाठी प्रस्तावित जागेची पाहणी करण्यात आल्याचे ना. शिवेंद्रसिंहराजे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने जागेची मोजणी व इतर बाबींचा अहवाल शासनाकडे सादर करावा, अशा सूचना ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना यावेळी केल्या.

# आरआयटीत नव्या शैक्षणिक पर्वाला उत्साहात सुरुवात

## जयंतराव पाटील: विद्यार्थ्यांना दिला व्यापक विचारांचा मंत्र

**ईश्वरपूर / प्रतिनिधी:–**

कासेगाव शिक्षण संस्था संचलित राजारामबापू इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, राजारामनगर येथे प्रथम वर्षांमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री व आमदार जयंतराव पाटील यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून सिमेन्सच्या ॲकॅडमिक इनिशिएटिव्जचे हेड रमेश बी. एस. हे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात पारंपरिक सरस्वती पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. व्यासपीठावर संस्थेचे सचिव प्राचार्य आर. डी. सावंत, गव्हर्निंग कौन्सिलचे सदस्य प्रा.शामराव पाटील, आरआयटीचे संचालक डॉ.पी.व्ही. कडोले, डीन स्टुडन्ट डेव्हलपमेंट डॉ.एल.एम. जुगुळकर, सायन्सेस अँड ह्युमॅनिटीज विभागप्रमुख डॉ.एम.बी. मंडले हे उपस्थित होते.




कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा सिमेन्सच्या ॲकॅडमिक इनिशिएटिव्जचे प्रमुख रमेश बी. एस. यांनी मार्गदर्शन करताना, अपयश हा यशाच्या प्रवासातील एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने प्रयत्न करत विविध कौशल्ये विकसित करावीत. असे आवाहन केले. उद्योग क्षेत्राच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी त्यानुसार आवश्यक व उपयुक्त ज्ञान आत्मसात करावे, असे त्यांनी सांगितले. उद्योग आणि शिक्षण क्षेत्रातील समन्वय साधण्यासाठी आरआयटीमध्ये उपलब्ध असलेल्या विविध ऐच्छिक अभ्यासक्रमांचा विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असा सल्लाही त्यांनी दिला. तसेच संस्थेच्या शैक्षणिक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवून आरआयटीच्या शैक्षणिक प्रगतीत आपले योगदान द्यावे, असे आवाहन रमेश बी. एस. यांनी केले

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार जयंतराव पाटील यांनी विद्यार्थ्यांनी आपले ध्येय मर्यादित न ठेवता व्यापक विचार करण्याचे आवाहन केले. आजचा काळ हा बहुविद्याशाखीय शिक्षणाचा आहे. केवळ वर्गातील शिक्षणावर अवलंबून राहून चालणार नाही. आरआयटीमधील चार वर्षांच्या शैक्षणिक प्रवासानंतर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वात सकारात्मक आणि सर्वांगीण परिवर्तन अपेक्षित आहे. असे त्यांनी सांगितले.

तंत्रज्ञानात दिवसेंदिवस वेगाने बदल होत असल्याने विद्यार्थ्यांसमोर आव्हानांसोबतच मोठ्या संधीही उपलब्ध आहेत. या बदलांशी जुळवून घेणे यशस्वी होण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे, असे त्यांनी नमूद केले. 'आज प्रत्येक क्षेत्रातील तज्ज्ञ कधीतरी नवखाच होता, हा सकारात्मक विचार मनात ठेवून विद्यार्थ्यांनी आपल्या शैक्षणिक प्रवासाला सुरुवात करावी, असा सल्लाही त्यांनी दिला. विद्यार्थ्यांनी दैनंदिन जीवनातील समस्या ओळखून त्यावर अभियांत्रिकी ज्ञानाचा वापर करून प्रभावी उपाय शोधण्याचा प्रयत्न करावा. अशा प्रकारे ज्ञानाचा प्रत्यक्ष जीवनाशी संबंध जोडत नाविन्यपूर्ण विचार करण्याची सवय विद्यार्थ्यांनी विकसित करावी, असे आवाहन केले.

संचालक डॉ.पी.व्ही. कडोले यांनी आरआयटीच्या स्थापनेपासून ते आजपर्यंतच्या शैक्षणिक वाटचालीवर प्रकाश टाकत, संस्थेच्या एनबीए, नॅक मानांकन, तसेच एम्पॉवर्ड ऑटोनॉमस इन्स्टिट्यूट म्हणून प्राप्त केलेल्या दर्जाबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांना आर आय टी मधील विविध स्टूडंट क्लब्स, ट्रेनिंग प्रोग्रॅम्स, सेमिस्टर एक्सचेंज आणि परदेशी विद्यापीठांशी असलेल्या सामजस्य करारा विषयी माहिती दिली. आरआयटी मध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना परदेशामध्येही शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध असून, परदेशी विद्यापीठातील विद्यार्थी व प्राध्यापकही आरआयटी मध्ये येत असल्याचे नमूद केले. विद्यार्थ्यांनी प्रथम वर्षापासूनच अभ्यासाकडे गांभीर्याने पाहून आपल्या करिअरचे स्पष्ट ध्येय निश्चित करावे आणि त्यादृष्टीने सातत्यपूर्ण प्रयत्न करावेत, असे आवाहन डॉ. कडोले यांनी केले.

कार्यक्रमादरम्यान अभियांत्रिकी, व्यवस्थापन व एमसीए विभागांमध्ये प्रवेश घेणाऱ्या सर्वोत्तम सीईटी गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला, तसेच आरआयटीच्या ट्विनिंग प्रोग्रॅमच्या माध्यमातून विदेशात उच्च शिक्षणासाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचाही गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत विभागप्रमुख डॉ. एम. बी. मंडले यांनी केले, तर सूत्रसंचालन डॉ. योगिनी कुलकर्णी व आभार प्रदर्शन डॉ. एस. एन. यादव यांनी केले. या समारंभाचे यशस्वी आयोजन महाविद्यालयातील प्रथम सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी वर्गाने केले




# शेळकबाव हायस्कूलचे सुरेश मोहिते आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित

**कडेगाव/प्रतिनिधी:–**

कडेगाव तालुक्यातील डोंगराई शिक्षण संस्था संचलित शेळकबाव हायस्कूल, शेळकबावचे मुख्याध्यापक सुरेश मोहिते सर यांना कडेगाव तालुक्यातील आदर्श मुख्याध्यापक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर व माध्यमिक शिक्षक संघ यांच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला.

संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमारजी साळुंखे व माजी मंत्री अजितराव घोरपडे सरकार यांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता, शालेय व्यवस्थापन, शिक्षक व पालक यांच्याशी सुसंवाद तसेच विद्यालयाच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली.

मुख्याध्यापक म्हणून मोहिते सर यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसह विविध शैक्षणिक व सहशालेय उपक्रमांना प्रोत्साहन दिले आहे. त्यांच्या या सन्मानाबद्दल डोंगराई शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व ग्रामस्थांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# मुद्रांक विक्रेत्यांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी एकत्रीत लढ्याचा निर्णय

## शंकरराव उर्फ बाळासाहेब भिसे यांची आग्रही भूमिका

**पाटण/प्रकाश कांबळे:–**

राज्यातील मुद्रांक विक्रेते, दस्तलेखनीक यांच्या विविध प्रश्न, मागण्यांसाठी राज्यातील मुद्रांक विक्रेते व दस्तलेखनीकांच्या संघटनांनी एकत्र येत कृती समितीच्या माध्यमातुन शासन पातळीवर लढा देण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती सातारा संघटनेचे अध्यक्ष बाळासाहेब भिसे, व नाशिक संघटनेचे सचिव मनोज गांगुर्डे यांनी दिली.



बैठकीस पुणे, सातारा, सांगली, नाशिक, धुळे, परभणी, नांदेड, छत्रपती संभाजी नगर, अहिल्यानगर, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, रायगड, कोल्हापूर, धाराशिवसह जिल्हांमधून प्रतिनिधी उपस्थित होते सातारा संघटनेचे अध्यक्ष शंकर ऊर्फ बाळासाहेब भिसे (पाटण- सातारा), नाशिक संघटनेचे सचिव मनोज गांगुर्डे (नाशिक), राहुल नाईक पुणे शिवाजी भोंगे (परभणी), सुनील पानसकर , सुनील भिसे (कराड), माधवराव पाटील (धुळे), संगीता लोखंडे वैशाली हिंगमिरे पुणे, अलका देशमुख (ठाणे) जावेद चौधरी अकलूज शाम वरुडकर सिंधुदुर्ग सारनाथ रोकडे यवतमाळ यांचा समावेश होता. पुण्यातील गुप्ते मंगल कार्यालयात ही बैठक झाली.

मुद्रांक विक्रीचे कमीशन तीन टक्के कायम ठेवुन प्रत्येक मुद्रांकावर सेवा शुल्क (सर्व्हिस चार्ज) घेण्याचा अधिकार देण्यात यावा, मयत विक्रेत्यांचे वारस आणि ६५ वर्ष व त्यापुढील वयाच्या विक्रेत्यांच्या वारसांना विना अट परवाने देण्यात यावे, व मेडिकली अनफिट व्यवसाय बंधूंच्या परवाना हस्तांतरणास वयाची अट लावू नये राज्यातील सर्वच तहसील कार्यालये, दुय्यम निंबधक, सहजिल्हा निंबधक व जिल्हाधिकारी कार्यालयांच्या आवारात मुद्रांक विक्रेत्यांना काम करण्यासाठी स्वतंत्र जागा द्यावी, यासह विविध मागण्यांसाठी एकत्रित लढा देण्यात येणार आहे.

# प्रा.दिनेश रसाळ यांना महाराष्ट्र शासनाचा महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार जाहीर

## संस्कृत विषयातील उल्लेखनीय कार्याची शासनाकडून दखल

**पुसेगाव/प्रतिनिधी:–**

संस्कृत क्षेत्रातील भरीव कार्य ,राष्ट्रीय, राज्य व आंतरराष्ट्रीय स्तरावर २५ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित १७ सुवर्णपदके, एक रौप्यपदक,एक कांस्यपदक प्राप्त

माण तालुक्यातील मुळगाव कोळेवाडी येथील योगदानाची दखल इंचगिरी रसाळ संप्रदायाचे संस्थापक राजाधिराज शंकर महाराज रसाळ यांचे नातू आणि मठाधिपती राजाधिराज पांडुरंग रसाळ यांचे चिरंजीव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात संस्कृत विषयांचे प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेले संस्कृतचे गाढे अभ्यासक प्रा. दिनेश रसाळ यांना महाराष्ट्र शासनाचा सन २०२३ चा 'महाकवी कालिदास संस्कृत साधना पुरस्कार' जाहीर झाला असल्याची माहिती त्यांचे निकटवर्तीय शिष्य ब्रह्मदेव मोहिते यांनी दिली आहे.



संस्कृत प्राध्यापक व तत्सम अभ्यासक या संवर्गातून त्यांची या पुरस्कारासाठी निवड झाली असून, लवकरच महाराष्ट्र शासनाच्या वतीने त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार असल्याचे सांगितले.

सन्मानचिन्ह, मानपत्र आणि २५ हजार रुपये रोख असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. प्रा. रसाळ यांच्या संस्कृत, भारतीय दर्शन, संत साहित्य आणि अध्यात्म क्षेत्रातील प्रदीर्घ व उल्लेखनीय योगदानाची शासनाने घेतलेली ही दखल मानली जात आहे.

**तिरुपती विद्यापीठाचा 'भाषण भीष्म' पुरस्काराने गौरव**

ज्ञानसिंहासनाधीश्वर जगद्गुरु चंदशेखर शिवाचार्य यांचा सुवर्णकण व गौरव पुरस्काराने सन्मान प्रा.दिनेश रसाळ हे सध्या तरडगाव येथे वास्तव्यास असून, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संस्कृत व प्राकृत विभागात गेल्या १७ वर्षापासून कार्यरत आहेत. प्राध्यापक, व्याख्याते कीर्तनकार तसेच संत साहित्यांचे अभ्यासक म्हणून त्यांनी स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

संस्कृत प्रसारासाठी व्यापक कार्य त्यांनी योगसूत्रांचे मराठी विवेचन, अद्भुत चिंतामणी, योगपरंपरा, ध्यानबिंदू उपनिषदांचे भाषांतर, भागवतातील अद्वैत ब्रह्म संकल्पना, इंचगिरी रसाळ संप्रदाय भजनी मालिका, भारतीय दर्शन आदी विषयांवर राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर २५ हून अधिक शोधनिबंध प्रकाशित केले आहेत. विविध संस्थांमध्ये जबाबदाऱ्या कीर्तनशास्त्र

अभ्यास मंडळ, क. का. शास्त्र विद्यापीठ, रामटेक, संतभूमी सामाजिक व आध्यात्मिक संस्था, विद्वत परिषद रामटेक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यास मंडळ नाशिक, दर्शनशास्त्र अभ्यास मंडळ रामटेक, अद्वैत वेदांत अभ्यास मंडळ, महर्षी पाणिनी संस्कृत व विद्यापीठ उज्जैन, केंद्रीय संस्कृत विद्यापीठ दिल्ली, संस्कृत व प्राकृत भाषा मंडळ तसेच इंचगिरी रसाळ संप्रदाय चॅरिटेबल ट्रस्टचे सचिव म्हणूनही ते कार्यरत आहेत.

प्रा. दिनेश रसाळ यांना जाहीर झालेल्या या मानाच्या पुरस्कारामुळे कोळेवाडी, तरडगाव मान, खटाव, खंडाळा आणि इंचगिरी रसाळ संप्रदायाच्या सर्व भाविकातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# क्रीडा स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीन विकास

## राहुल महाडिक

**ईश्वरपूर / प्रतिनिधी:–**

येथील नानासाहेब महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या कोल्हापूर विभागीय स्पर्धेची प्रथम सभा संपन्न झाली. या सभेमध्ये मनोगत व्यक्त करताना श्री वेंकटेश्वरा शिक्षण संस्थेचे सचिव मा.राहुलदादा महाडिक यांनी शिक्षणाबरोबरच क्रीडा, कला, संस्कृतीत या स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो असे प्रतिपादन केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संस्थेचे कार्यकारी संचालक डॉ. महेश जोशी यांनी महाविद्यालयाच्या क्रीडा विभागाच्या कामगिरीचा आढावा घेतला तसेच सलग पाच वर्ष विद्यापीठाने दिलेल्या जबाबदारी बद्दल मा. कुलगुरू तसेच इतर पदाधिकारी यांचे आभार व्यक्त केले. सदर सभेकरिता सांगली, सातारा, कोल्हापूर, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यातून विविध अभियांत्रिकी व फार्मसी महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण संचालक व क्रीडा समन्वयक उपस्थित होते.




या सभेमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ चे क्रीडा स्पर्धांचे नियोजन करण्यात आले. यामध्ये स्पर्धांचे आयोजक, स्पर्धांच्या तारखा व इतर सर्व महत्त्वाच्या विषयावर चर्चा करण्यात आली,

या प्रथम सभेचे संयोजन महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षण संचालक एन. आय. एस. हॉकी प्रशिक्षक प्रा. संदीप पाटील तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक यांनी केले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सत्यजित घोरपडे यांनी केले.

# तालुकास्तरीय फुटबॉल स्पर्धेत आदर्श पब्लिक स्कूल विजेता

**विटा /प्रतिनिधी:–**

खानापूर तालुकास्तरीय शालेय फुटबॉल स्पर्धेत विटा येथील लोकनेते हणमंतराव पाटील चॅरिटेबल ट्रस्टच्या आदर्श पब्लिक स्कूल (स्टेट बोर्ड)च्या १७ वर्षांखालील फुटबॉल संघाने दमदार सांघिक खेळाचे प्रदर्शन करीत प्रथम क्रमांक पटकावला.



बळवंत कॉलेजच्या मैदानावर झालेल्या या स्पर्धेत आदर्शच्या खेळाडूंनी सुरुवातीपासूनच शिस्तबद्ध आणि नियोजनबद्ध खेळ करत प्रतिस्पर्धी संघांना प्रभावीपणे सामोरे गेले. बचावफळीतील भक्कमपणा, मिडफिल्डमधील अचूक पासिंग आणि आक्रमक खेळाच्या जोरावर संघाने अंतिम सामन्यातही आपला दबदबा कायम ठेवत विजेतेपदावर शिक्कामोर्तब केले.

या यशासाठी खेळाडूंची नियमित मेहनत, सातत्यपूर्ण सराव, संघभावना आणि प्रशिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. क्रीडा शिक्षक सूरज मगदूम व शिवराज पाटील यांनी विद्यार्थ्यांना तांत्रिक प्रशिक्षण तसेच सामन्याच्या रणनीतीबाबत मार्गदर्शन केले.

या विजयाबद्दल प्राचार्य सुहास तळेकर यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी मैदानावर दाखविलेली जिद्द, शिस्त, आत्मविश्वास आणि संघभावना हीच विजयाची खरी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी क्रीडेला महत्त्व असल्याचेही त्यांनी नमूद केले.

संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ड. सदाशिवराव भाऊ पाटील, अध्यक्ष ड. वैभव दादा पाटील व कार्यकारी संचालक पी. टी. पाटील यांनी विजेत्या संघासह क्रीडा शिक्षक व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले. या यशामुळे आदर्श पब्लिक स्कूलच्या क्रीडा क्षेत्रातील वाटचालीत आणखी एका मानाच्या तुऱ्याची भर पडली आहे.

# दफनभूमीत घुसून समाध्यांची विटंबना

**सातारा/प्रतिनिधी:–**

वीरशैव लिंगायत समाजाच्या दफनभूमीत अनधिकृत प्रवेश करून समाध्यांची विटंबना केल्याप्रकरणी फलटण शहर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. दत्तनगर परिसरात ११ सप्टेंबर रोजी सकाळी हा प्रकार घडला.

राजाराम विश्वनाथ फणसे (वय ७३, रा. शुक्रवार पेठ, फलटण) यांनी याबाबत फिर्याद दिली. त्यानुसार अजिंक्य उर्फ झिपऱ्या रामभाऊ मदने व ओंकार रामभाऊ मदने (दोघे रा. उमाजी नाईक चौक, फलटण) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


## आज का अंदाज

**सोमवार दिनांक १४ सप्टेंबर २०२६**

| कल्याण बाजार 'पत्थर फोड एकच' | मुंबई बाजार 'पत्थर फोड एकच' |
| --- | --- |
| २ - ५ - ८ - ९ | २ - ३ - ६ - ७ |
| १२९-४५६-१३४-४५० | ४८०-१३९-१२३-८९० |
| २४६-६९०-२८८-३६० | ५७०-२३८-२६८-२५० |
| ३९०-७८०-३७८-२७० | ६६०-३३७-३३०-३४० |
| जोडी | जोडी |
| २३ -५३ - ८६ - ९६ | २८ - ३८ - ६१ - ७० |
| २१ -५१ - ८७ - ९७ | २९ - ३९ - ६४ - ७१ |
| २० -५० - ८४ - ९४ | २५ - ३५ - ६० - ७४ |

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि.१४-१५ सप्टेंबर

प्रो.रामकुमार मो.नं. ९८२२४८६०३४

**सोमवार दिनांक १४ सप्टेंबर २०२६**

सर्व बाजार साठी

३१ - ४१ - ५९ - ७९
३२ - ४२ - ५० - ७०
३८ - ४८ - ५६ - ७६

२२९ - २५७ - ३५७ - १७९
५९९ - १४९ - ७८० - २७८
३०० - ३५६ - ३५६ - ३७७

प्रो.रामकुमार मो.नं. ९८२२४८६०३४

| सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन डे | सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.ओपन नाईट |
| --- | --- |
| ३४६ ६८९ ५८० **३** १४९ २३९ ३३८ **४** ३७० ४६० ५५० **०** | ६९० ७८० ५०० **५** ४७० ५६० ३८० **१** १६० २५० ३४० **७** |
| **सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज डे** | **सर्व बाजारासाठी सोम.ते बुध.क्लोज नाईट** |
| २९० ३८० ४७० **१** १३४ २६० ३५० **८** १७९ २५० ३४० **७** | १३८ ३३६ २२८ **२** १३९ २५६ ६७० **३** २४० ४५७ ७९० **६** |
| **सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन डे** | **सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.ओपन नाईट** |
| १५९ २५८ ३५७ **५** १४६ ५७९ २४५ **१** ६६० १३८ ५८९ **२** | २३८ १३९ ३३७ **३** १६७ २४८ ३४७ **४** १४० ४५६ ६९० **५** |
| **सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज डे** | **सर्व बाजारासाठी गुरु.ते शनि.क्लोज नाईट** |
| २२९ ४९० ५८० **३** २२३ ७०० १६० **७** ४७९ ३३४ ११८ **०** | ४०० ३३८ २५७ **४** ४५९ २३३ १८९ **८** २९९ ४७९ ३८९ **०** |

सर्व बाजारासाठी सिंगल अंक ओपन टू क्लोज

३ - ५ - ७ - ९
१

जबरदस्त पास होणारे चान्सेस दि. १४-०९-२०२६ १५-०९-२०२६ १६-०९-२०२६

प्रो.रामकुमार मो.नं. ९८२२४८६०३४


# प्रा.उषा गावडे यांचे निधन

**सातारा/प्रतिनिधी:–**

मलकापूर, ता. कराड येथील सौ. प्रा. उषा संजय गावडे यांचे अल्पशा आजाराने पुणे येथे उपचार घेत असताना वयाच्या ५७ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पती,एक मुलगा असा परिवार आहे.



मूळचे पाटण येथील गावडे परीवार आहे. वडूज, ता.खटाव येथील हुतात्मा परशुराम कनिष्ठ महाविद्यालयात गावडे मॅडमनी काम केले होते. कराड न्यायालयातून सहाय्यक अधीक्षक म्हणून निवृत्त झालेले संजय गावडे यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# कॅप्टन यशवंत सणस यांचे निधन

**सातारा/प्रतिनिधी:–**

जकातवाडी,ता. सातारा येथील श्री.बालाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व रिटायर्ड ऑर्डिनेरी कॅप्टन यशवंत मुगुटराव सणस यांचे निधन झाले आहे.



माजी सरपंच चंद्रकांत सणस यांचे ते वडील होत. येथील कुरनेश्वर मॉर्निंग ग्रुपतर्फे सुरेश माने, अनिल कांबळे, उमेश खंडूझोडे, शंकर सकटे, अनिल वीर, पी.कोडगुले आदी पदाधिकारी व सदस्यांनी आदरांजली अर्पण केली.

# गौतम कांबळे यांचे निधन

**सातारा/प्रतिनिधी:–**

कासरूड ता. महाबळेश्वर येथील गौतम लक्ष्मण कांबळे यांचे वयाच्या ५९ वर्षी निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा व २ विवाहित मुली, जावई व नातवंडे असा परिवार आहे.



यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हा पदाधिकारी दिलीप यादव, तालुका सर्व पदाधिकारी,बंधुत्व प्रतिष्ठानचे संस्थापक अनिल वीर, समाजप्रबोधन मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. पुण्यानुमोदनचा कार्यक्रम रविवार दि.१३ रोजी सकाळी १० वा. विहारात होणार आहे.

# पाळीव कुत्र्यावर कोयत्याने वार; बोरगावात एकावर गुन्हा

**सातारा/प्रतिनिधी:–**

कोणतेही स्पष्ट कारण नसताना पाळीव कुत्र्यावर कोयत्याने हल्ला करून त्याला गंभीर जखमी केल्याची घटना बोरगाव (ता. कोरेगाव) येथे १० सप्टेंबर रोजी सायंकाळी घडली. याप्रकरणी रहिमतपूर पोलिसांनी एकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

विष्णू जगन्नाथ पवार (वय ४९, रा. बोरगाव) यांनी याबाबत पोलिसांत फिर्याद दिली. त्यानुसार वसंत पवार (रा. बोरगाव) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादीच्या घराजवळील सार्वजनिक रस्त्यावर संजय रघुनाथ घाडगे यांच्या घरासमोर हा प्रकार घडला. आरोपीने पवार यांच्या पाळीव कुत्र्यावर अचानक हल्ला करून त्याच्या पाठीत कोयत्याने वार केला. यात कुत्रा गंभीर जखमी झाला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर रहिमतपूर पोलिसांनी प्रकरणाची नोंद केली. हल्ल्यामागील नेमके कारण अद्याप समोर आलेले नाही. पोलिसांकडून त्याबाबत तपास सुरू आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलिस हवालदार जे. जी. भुजबळ करीत आहेत.

# माझ्या एकट्याच्या सहीने मराठा...

पान १ वरुन

मराठा आरक्षणाचा निर्णय घाईघाईने घेतल्यास त्याला न्यायालयात आव्हान मिळू शकते. त्यामुळे सर्व कायदेशीर व तांत्रिक बाबी तपासूनच सरकार ठोस निर्णय घेत आहे. आरक्षण मिळाल्यानंतर ते न्यायालयीन प्रक्रियेत टिकले पाहिजे, अशी सरकारची भूमिका असल्याचे शिवेंद्रराजे यांनी स्पष्ट केले.

मराठा आरक्षण समितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील तसेच प्रसाद लाड यांनी मनोज जरांगे यांची भेट घेऊन चर्चा केली आहे. सातारा गॅझेटसंदर्भातील समितीचा अहवालही मागविण्यात आला आहे. हैदराबाद गॅझेटला न्यायालयात आव्हान देण्यात आले असून, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासंदर्भातील कायदेशीर बाजू उच्च न्यायालयात मांडली आहे.

आरक्षण देताना अनेक कायदेशीर आणि तांत्रिक बाबींचा विचार करावा लागतो. 'आरक्षणाचा विषय केवळ छत्रपती घराण्याचा म्हणून माझ्या सहीने होणार नाही. माझ्या एकट्याच्या सहीने आरक्षण मिळणार नाही,' असे शिवेंद्रराजे यांनी स्पष्ट केले.

शिंदे समितीचा अहवाल तसेच अन्य कायदेशीर बाबींचा सखोल विचार करूनच सरकार निर्णय घेत आहे. केवळ तोंडाला पाने पुसण्यासाठी आरक्षण देणार नाही. एकदा आरक्षण दिल्यानंतर ते न्यायालयीन प्रक्रियेत रद्द झाले, तर पुन्हा आरक्षण मिळवणे अधिक कठीण होऊ शकते. त्यामुळे या विषयाचे गांभीर्य मनोज जरांगे यांनीही लक्षात घ्यावे, असे आवाहन शिवेंद्रराजे यांनी केले.

# डॉ. पतंगराव श्रीपतराव कदम विद्यालय, शिरसगाव सोनसळ येथे माता पालक मेळावा उत्साहात संपन्न

**विटा/प्रतिनिधी:–**

डॉ. पतंगराव श्रीपतराव कदम विद्यालय, शिरसगाव सोनसळ येथे आज दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी माता पालक मेळावा मोठ्या उत्साहात पार पडला.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ. उज्वला रमेश सपकाळ होत्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागाच्या प्रमुख सौ. स्नेहल अमर शिंदे यांनी केले. प्रास्ताविकामध्ये माता पालक मेळावा घेण्यापाठीमागचा मुख्य हेतू स्पष्ट केला.



यावेळी प्रमुख मार्गदर्शक अदाटे व्ही. आर. यांनी मुलींच्या सर्वांगीण विकासात पालकांची भूमिका महत्वाची असल्याचे सांगितले. माता पालक मनोगतामध्ये सौ. ऋतुजा आकाश तोरणे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. तर सौ. शुभांगी अमोल भोसले यांनी अतिशय महत्वाचा विषय मांडला. मुलींच्या समस्या, त्यांच्या अडचणी यावर फक्त शिक्षकांचीच नव्हे तर पालकांचीही तितकीच जबाबदारी असते. मुलींना शाळेत आणि घरात सुरक्षित वातावरण देणे, त्यांच्याशी मोकळेपणाने संवाद साधणे हे पालकांचे कर्तव्य आहे, असे त्यांनी सांगितले.

शिक्षक मनोगत सौ. शिकलगार एस. बी. यांनी व्यक्त केले. त्यात त्यांनी मुलींच्या अभ्यासाबरोबर शारीरिक आरोग्याची काळजी घेणे हेही तितकेच महत्वाचे असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या आभार प्रदर्शनावेळी सौ. जयश्री सचिन लावंड यांनी शाळेतील मुलींच्या स्वच्छतागृहामध्ये सॅनिटरी नॅपकिन डिस्पोजल मशीन बसविण्याची मागणी केली. मुलींच्या आरोग्याच्या दृष्टीने आणि स्वच्छतेच्या दृष्टीने ही मशीन अत्यंत आवश्यक असून शाळा प्रशासनाने यावर लवकरात लवकर कार्यवाही करावी, अशी आग्रही मागणी त्यांनी यावेळी केली.यावेळी मोठ्या संख्येने माता-भगिनी उपस्थित होत्या.

# आदर्श विद्यामंदिर विंग मधील अर्शिया

**कोळे/प्रतिनिधी:–**

हिदायतुला मुल्ला हिने तालुकास्तरीय निबंध स्पर्धेमध्ये तृतीय क्रमांक पटकावला पंचायत समिती कराड यांच्यामार्फतशाहू विचाराचा जागर या विषयावर तालुकास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये या स्पर्धेमध्ये विद्यालयाची कु

आर्शिया हिदायतुला मुल्ला इयत्ता सहावी हिने लहान गटातून तालुक्यामध्ये तृतीय क्रमांक पटकावला तिला सौ वनिता पाटील व सौ शितल सादळे यांचे मार्गदर्शन लाभले त्याबद्दल तिचे विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री फकीर टी आर, उपमुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक शिक्षकेतर बंधू भगिनींनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस खूप शुभेच्छा दिल्या





## लकी चान्स

**सोमवार दि. १४ सप्टेंबर२०२६**

**✻ मिलनम ✻ उदय-अस्त**

| | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| 9 | 126 469 900 | 5 | 230 258 780 | 1 | 146 470 344 |
| | 79-93 | | 45-57 | | 81-12 |

**✻ कल्याणम ✻ उदय-अस्त**

| | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| 6 | 240 268 330 | 8 | 125 260 440 | 4 | 149 239 590 |
| | 16-64 | | 28-80 | | 54-47 |

**✻ मुंबैम ✻ उदय-अस्त**

| | | | | | |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| 2 | 345 390 200 | 0 | 190 280 244 | 3 | 120 346 337 |
| | 62-21 | | 70-08 | | 53-39 |

सदर शुंभाक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे कृपया दुरुपयोग करु नये.

मो.नं. ९९७५४७९८२६

# गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात घरगुती गणेश मूर्तींचे आगमन

## सोमवारी दुपारपर्यंत होणार घरोघरी प्रतिष्ठापना

**सातारा/प्रतिनिधी:–**

गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया..च्या जयघोषात आज रविवारी च अनेक गणेश भक्तांनी गणेश चतुर्थी निमित्त घरोघरी प्रतिष्ठापना केल्या जाणाऱ्या गणेश मुर्ती मोठ्या उत्साहात आणि मोरयाच्या जयघोषात घरी आणल्या सोमवारी दुपारी या गणेशाचा मुहूर्त प्रतिष्ठित स्थापनेसाठी दुपारी एक वाजून ५२ मिनिटांपर्यंत आहे.

गणेश भक्तांचा खरेदीसाठीही उत्साह मोठा दिसून येत होता. सातारा शहरातील मोती चौक, राजवाडा ,पोवई नाका परिसरात गणेश पूजेसाठी लागणाऱ्या विविध वस्तू तसेच गणेशाला आवडणारी विविध पत्री, कमळे, केवडा, दूर्वा याचबरोबर २१पत्रींमध्ये बेल, तुळस ,आघाडा ,माका, विष्णुकांत ,शमी यासारख्या पत्रीचीही खरेदी करण्यासाठी ग्राहकांची गर्दी झाली होती.

सणवार म्हटले की फुलांच्या जणांना मोठा भाव येतो ,त्यामुळे सातारा शहरातील अनेक फुलविक्रेत्यांकडे फुलांचे पूजेसाठी हार तसेच केवडा, गुलाब ,शेवंती यासारख्या फुलांना मोठी मागणी होती .दोनशे रुपये ते आठशे रुपये किलो दराने ही फुले मोठ्या प्रमाणात विक्री होत होती.

शहरातील प्रमुख रस्त्यांवर खरेदीसाठी बाहेर पडलेल्या सातारकरांमुळे वाहतूक कोंडीचा प्रत्यय वारंवार दिसून येत होता. वाहतूक शाखेचे पोलीस कर्मचारी तसेच स्वयंसेवकही ही वाहतूक सुरळीत करण्यासाठी आटोकाठ प्रयत्न करताना दिसत होते. मात्र वारंवार वाहतूक कोंडीमुळे वाहन चालकांना अक्षरशा मुख्य रस्ते सोडून छोट्या मार्गाचा तसेच बोळातूनच इकडून तिकडे जाण्याचा प्रसंग येत होता. अनेक सार्वजनिक गणेश मंडळा नी आपल्या मंडळाच्या गणेश मूर्ती मागील आठवड्यापासूनच वाजत गाजत मंडपामध्ये आणून प्रतिष्ठित प्रतिष्ठापना करण्यासाठी आणून ठेवलेले आहेत.

त्यामुळे अनेक रस्त्यात मंडपाचे काम अपूर्ण असतानाही या मूर्ती पडदा आणि कापड टाकून झाकून ठेवण्यात आलेल्या आहेत.



गणरायाच्या स्वागतासाठी तसेच पूजेसाठी लागणारे विविध प्रकारची फुले हारपत्री खरेदीसाठी मोती चौक परिसरामध्ये मोठी गर्दी झाली होती गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषात घरोघरी विघ्नहर्ता गणरायाचे आज एक दिवस अगोदरच विधी पूर्वक आगमन झाले. गणपती बाप्पा मोरया..च्या जय घोषात घरगुती गणेश मूर्ती स्टॉल वरून भाविकांनी प्रतिष्ठापनेसाठी घरी नेल्या - सर्व फोटो ..अतुल देशपांडे ,सातारा.

सोमवारी सकाळपासून दुपारी पावणेदोन पर्यंत घरगुती गणेश मूर्ती प्रतिष्ठापनेचा मुहूर्त सांगितल्यामुळे उद्या सकाळी लवकरच या गणेश मुर्ती घरोघरी आरत्या आणि स्तोत्रांच्या जयघोषात प्रतिष्ठापना केल्या जाणार आहेत .

एकंदरीतच दरवर्षी गणेशोत्सव हा मोठा अल्हाददायक आणि उत्साहवर्धक असा हा उत्सव असल्यामुळे सातारा शहरात ऐतिहासिक अशा शाहू नगरीत एक वेगळेच मांगल्यमय वातावरण दिसून येत आहे.

# गणपती बाप्पांच्या आगमनासाठी पाटण शहरात जय्यत तयारी

**पाटण/प्रकाश कांबळे:–**

गणपती बाप्पा मोरयाच्या आगमनाला अवघा एक दिवस शिल्लक राहिल्याने पाटण शहरातील वातावरण भक्तिमय झाले आहे. गणरायाच्या स्वागतासाठी घरगुती तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांची तयारी अंतिम टप्प्यात आली असून, मंडळांचे कार्यकर्ते रात्रंदिवस मेहनत घेत आहेत.

गणपती बाप्पांच्या स्वागतासाठी आकर्षक सजावट करण्याकडे नागरिकांचा कल असून, विविध प्रकारची फुले, फुलांच्या माळा, विद्युत रोषणाई, तोरणे, सजावटीच्या वस्तू तसेच विविध रंगांची डेकोरेशन सामग्री बाजारपेठेत उपलब्ध झाली आहे. पाटण शहरातील विविध ठिकाणी गणपती सजावटीच्या साहित्याचे स्टॉल उभारण्यात आले आहेत.



जुने बस स्थानक, नवीन बस स्थानक, झेंडा चौक, लायब्ररी चौक तसेच मुख्य बाजारपेठेत सजावटीचे साहित्य खरेदी करण्यासाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. आपल्या लाडक्या बाप्पाचे आगमन आकर्षक व दिमाखदार व्हावे, यासाठी नागरिकांकडून विविध वस्तूंची खरेदी केली जात आहे.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या मंडपांमध्येही अंतिम तयारीला वेग आला असून, कार्यकर्ते सजावट, विद्युत रोषणाई आणि इतर कामे पूर्ण करण्यात व्यस्त आहेत. त्यामुळे गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पाटण शहरातील बाजारपेठ गजबजली असून सर्वत्र उत्साहाचे आणि भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

# ९२१ दिव्यांग, ज्येष्ठांना मिळणार मदतीचा आधार

## ८०.७८ लाखांचे सहाय्यभूत साहित्य ; १७ सप्टेंबरला पाचवड फाट्यावर वितरण

**कराड/प्रतिनिधी : –**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांना दैनंदिन जीवनात आवश्यक असलेले सहाय्यभूत साहित्य मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कृष्णा विश्व विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार डॉ. अतुल भोसले यांच्या पुढाकारातून गुरुवार, दि. १७ सप्टेंबर रोजी पाचवड फाटा येथील आनंद मल्टिपर्पज हॉलमध्ये या साहित्याचे वितरण करण्यात येणार आहे.

भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाच्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्या योजनेंतर्गत कोयना वसाहत येथे दि. १ ते ३ जुलैदरम्यान तपासणी शिबिर घेण्यात आले होते. या शिबिरातील तपासणीनंतर पात्र ठरलेल्या ९२१ दिव्यांग व ज्येष्ठ नागरिकांसाठी ८०.७८ लाख रुपयांचे सहाय्यभूत साहित्य मंजूर झाले आहे.



यामध्ये व्हीलचेअर, कमोडसह व्हीलचेअर, काठी, श्रवणयंत्र, कंबरपट्टा, गुडघ्याचा पट्टा, नेक बेल्ट, स्मार्टफोन, पाठीचा पट्टा, कमोड चेअर आदी साहित्याचा समावेश आहे. या साहित्यामुळे लाभार्थ्यांना हालचाल, दैनंदिन वापर आणि आवश्यक संपर्काच्या बाबतीत अधिक सुलभता मिळण्यास मदत होणार आहे.

साहित्य वितरणाचा कार्यक्रम दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता आनंद मल्टिपर्पज हॉल, पाचवड फाटा येथे होणार असून डॉ. सुरेश भोसले व आमदार डॉ. अतुल भोसले यांच्या हस्ते पात्र लाभार्थ्यांना साहित्य देण्यात येणार आहे. पात्र लाभार्थ्यांनी कार्यक्रमास येताना मूळ आधारकार्ड सोबत आणावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# साखरेची किमान आधारभूत किंमत ५० रुपय तर इथेनॉलचा दर ७० रुपये करा

## खा. राजू शेट्टी:२९ सप्टेंबरला केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या निवासस्थानासमोर बेमुदत धरणे आंदोलन

**ईश्वरपूर / प्रतिनिधी :–**

साखरेची किमान आधारभूत किंमत प्रतिकिलो ५० रुपये करावी, तसेच इथेनॉलचा दर किमान ७० रुपये करावा, या प्रमुख मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना आणि कर्नाटक राज्य रयत संघटनेच्या वतीने येत्या २९ सप्टेंबर रोजी केंद्रीय मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या निवासस्थानासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते मा.खा. राजू शेट्टी यांनी दिली.

या आंदोलनाच्या नियोजनासाठी वाळवा तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक शासकीय विश्रामगृह, ईश्वरपूर येथे पार पडली. यावेळी आगामी आंदोलनाची दिशा,



नियोजन तसेच शेतकऱ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग याबाबत चर्चा करण्यात आली.

यावेळी बोलताना मा.खा. राजू शेट्टी म्हणाले, देशात साखरेची मागणी वाढली असून महाराष्ट्र आणि कर्नाटक ही देशातील प्रमुख ऊस उत्पादक राज्ये आहेत. देशाची साखरेची गरज भागविण्याची मोठी जबाबदारी या दोन राज्यांतील ऊस उत्पादक शेतकरी आणि साखर उद्योगावर आहे. दसरा व दिवाळीच्या सणांच्या पार्श्वभूमीवर साखरेची मागणी वाढत असल्याने केंद्र व राज्य शासनाकडून १५ ऑक्टोबरपासून साखर कारखाने सुरू करण्याचा आग्रह धरला जात आहे.

मात्र, १५ ऑक्टोबरला कारखाने सुरू केल्यास सुरुवातीच्या काळात उसाची रिकव्हरी कमी मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे साखर कारखान्यांचे तसेच ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होऊ शकते. रिकव्हरी कमी झाल्यास शेतकऱ्यांना मिळणाऱ्या उसाच्या दरावरही त्याचा परिणाम होणार आहे, असे शेट्टी यांनी सांगितले.

गेल्या नऊ वर्षांपासून साखरेची किमान आधारभूत किंमत प्रतिकिलो ३१ रुपये इतकीच आहे. उत्पादन खर्चात मोठी वाढ झालेली असताना साखरेच्या दरात मात्र अपेक्षित वाढ झालेली नाही. त्यामुळे साखरेची किमान आधारभूत किंमत प्रतिकिलो ५० रुपये करण्यात यावी, तसेच इथेनॉलचा दर किमान ७० रुपये करावा, अशी मागणी त्यांनी केली.

साखरेची किंमत आणि इथेनॉलच्या दरात वाढ झाल्यास साखर कारखान्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्याचा फायदा ऊस उत्पादक शेतकऱ्यांनाही मिळू शकतो. या दोन प्रमुख मागण्यांसाठी २९ सप्टेंबरपासून बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचे शेट्टी यांनी स्पष्ट केले.

या आंदोलनासाठी वाळवा व शिराळा तालुक्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे, यासाठी पुढील पंधरा दिवस गावागावांत जनजागृती करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांनी मोठ्या संख्येने आंदोलनात सहभागी होऊन मागण्यांना बळ द्यावे, असे आवाहन बैठकीत करण्यात आले.

बैठकीस जिल्हाध्यक्ष विश्वास कोळी, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते भागवत जाधव, कार्याध्यक्ष संदीप राजोबा, युवा आघाडीचे संजय बेले,राज्यप्रवक्ते एस. यू. संन्दे, शिवाजी पाटील, प्रकाश देसाई, प्रदीप पाटील, रविकिरण माने, संतोष शेळके, शहाजी पाटील, जगन्नाथ भोसले, बाबासाहेब सांद्रे, राजेंद्र माने, प्रभाकर पाटील, काशिनाथ निंबाळकर, प्रताप पाटील, प्रकाश माळी, आनंदराव शेळके, उत्तम पाटील, जयसिंग माने, शिवलिंग शेटे, प्रकाश पाटील, रवींद्र पाटील, अरविंद पाटील, दादासाहेब पाटील, शिवाजी मोरे यांच्यासह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाटण मधील रस्त्यावरील अतिक्रमण व अडथळा ठरलेली दुकाने ताबडतोब हटवावीत

## नगरपंचायत, पोलिस प्रशासनाने कारवाई करण्याची मागणी

**पाटण/प्रतिनिधी:–**

सणासुदीच्या दिवसांत काही दुकानदारांनी आपली दुकाने दुकानाच्या बाहेर अगदी रस्त्यावर थाटल्याने वाहतूकीसह नागरिकांना अडथळीचा सामना करावा लागत आहे. ग्राहकांच्या नजरेत येण्यासाठी काही व्यापाऱ्यांनी दुकाने दुकान गाळ्यांच्या बाहेर काढून रस्त्यावर मांडणी केली आहे. ही मांडणी वाहतुकीसह पायी चालणाऱ्या नागरिकांना अडथळा निर्माण करत आहे. या संदर्भात पाटण पोलिस प्रशासन आणि नगरपंचायत पाटण यांनी पाटण शहराच्या बाजारपेठेत अडथळा ठरलेली व रस्त्यावर अतिक्रमण झालेली दुकाने ताबडतोब हटवावीत आणि सणासुदीचे दिवस विनाअडथळा निर्विघ्नपणे पार पाडावी अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.



आजपासून सुरू होणाऱ्या गणपती उत्सवासाठी गेले काही दिवसांपासून सर्वत्र बाजारपेठांमध्ये ग्राहकांची फुल्ल गर्दी झालेली दिसते. पाटण शहरात देखील गणपती उत्सवाचा माहोल सगळीकडे उत्साहाचा दिसत आहे. या उत्सवासाठी पुणे - मुंबई सारख्या शहरात असणारे चाकरमानी गावाकडे मोठ्या संख्येने आले आहेत. हा गणपती उत्सव व्दिगुणित करण्यासाठी गणेशभक्त बाजारपेठेत विविध वस्तू, गणपती सजावटीचे साहित्य खरेदी करताना दिसत आहेत. सर्वच दुकानात ग्राहकांची रेलचेल मोठ्या संख्येने दिसत आहे. मुख्य बाजारपेठेत झालेल्या गर्दीमुळे पाटण शहरातील रस्ते ग्राहकांच्या गर्दीला अरुंद पडत आहेत. अशी परिस्थिती असताना मात्र काही दुकानदारांनी ग्राहकांच्या नजरेत येण्यासाठी दुकाने रस्त्यावर थाटली आहेत. याचा परिणाम वाहतुकीसह नागरिकांच्या गर्दीवर होताना दिसत आहे. दुकानदारांच्या आडमुठ्या धोरणामुळे अडथळा झालेली दुकाने रस्त्यावरुन ताबडतोब काढावीत आणि रस्ता मोकळा करावा जेणेकरून गणपती उत्सवासह पुढे आलेले सणासुदीचे दिवस आनंदी निर्विघ्नपणे पार पडतील. अशी अपेक्षा सर्वसामान्यांकडून व्यक्त केली जात आहे.

# ऊस विकासात सह्याद्रिची राष्ट्रीय भरारी

## उच्च साखर उतारा क्षेत्रात तृतीय क्रमांकाचा पुरस्कार:'बेस्ट केन डेव्हलपमेंट'चे दिल्लीत वितरण

**कराड/प्रतिनिधी : –**

यशवंतनगर (ता. कराड) येथील सह्याद्रि सहकारी साखर कारखान्याने ऊस विकासाच्या क्षेत्रात राष्ट्रीय स्तरावर ठसा उमटवला आहे. नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज (NFCSF), नवी दिल्ली यांच्यावतीने सन २०२४-२५ च्या गळीत हंगामातील उच्च साखर उतारा क्षेत्रातील उत्कृष्ट ऊस विकासासाठी तृतीय क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार सह्याद्रि कारखान्यास जाहीर झाला आहे.

या पुरस्काराबाबतचे पत्र NFCSF कडून कारखाना प्रशासनास प्राप्त झाले असून, २२ सप्टेंबर रोजी नवी दिल्लीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल सेंटर, जनपथ येथे केंद्रीय मंत्री व राज्यमंत्र्यांच्या प्रमुख



उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

सन २०२४-२५ या आव्हानात्मक गळीत हंगामातील कारखान्याच्या ऊस विकाससंबंधीची आकडेवारी आणि कामगिरीचे मूल्यमापन NFCSF च्या पुरस्कार निवड समितीमार्फत करण्यात आले. भारत सरकारच्या मुख्य साखर संचालकांच्या अध्यक्षतेखालील तज्ज्ञ समितीने सह्याद्रि कारखान्याची पुरस्कारासाठी निवड केली. ऊस विकास, उत्पादकता वाढ आणि उच्च साखर उतारा या क्षेत्रांतील कारखान्याच्या कामाची राष्ट्रीय पातळीवर दखल घेण्यात आली आहे.

कारखान्याचे कार्यकारी संचालक विश्वजीत शिंदे यांनी सांगितले की, कारखान्याचे प्रेरणास्थान स्वर्गीय यशवंतराव चव्हाण आणि संस्थापक पी. डी. पाटील यांच्या मार्गदर्शक विचारांनुसार ऊस विकासाला सातत्याने प्राधान्य देण्यात आले आहे. चेअरमन तथा राज्याचे माजी सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली कारखाना प्रशासन, ऊस उत्पादक सभासद आणि शेतकरी यांच्या संयुक्त प्रयत्नांतून ऊस विकासाच्या विविध उपक्रमांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. त्याचीच राष्ट्रीय पातळीवर दखल घेत हा सन्मान मिळाला आहे.

सह्याद्रि कारखान्यास यापूर्वीही उत्कृष्ट आर्थिक व्यवस्थापन, उच्च तांत्रिक क्षमता, उत्कृष्ट ऊस विकास तसेच पर्यावरणपूरक कामगिरीबद्दल महाराष्ट्र शासनाचा वनश्री पुरस्कार यांसह विविध राज्य व राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार मिळाले आहेत. त्यात आता राष्ट्रीय स्तरावरील 'बेस्ट केन डेव्हलपमेंट' पुरस्काराची भर पडली आहे.

हा सन्मान कारखाना प्रशासनाच्या कामगिरीसोबतच ऊस उत्पादक सभासद व शेतकऱ्यांच्या सातत्यपूर्ण योगदानाची दखल असल्याचे कार्यकारी संचालक विश्वजीत शिंदे यांनी नमूद केले.

# महामार्गावर ट्रकची कारला धडक; दोन्ही दरवाजे तुटले

**सातारा/प्रतिनिधी:–**

पुणे-बंगळूर राष्ट्रीय महामार्गावर अतित (ता. जि. सातारा) गावच्या हद्दीत भरधाव ट्रकने कारला धडक दिल्याने कारच्या उजव्या बाजूचे दोन्ही दरवाजे चक्काचूर झाले. शनिवारी (दि. १२) सकाळी साडेनऊच्या सुमारास हा अपघात झाला. सुदैवाने यात कोणतीही जीवितहानी झाली नाही.

आंध्र प्रदेशातील प्रत्युष एम. धरमय्या हे टाटा नेक्सॉन कारमधून सातारा ते कराड दिशेने जात होते. त्यावेळी तमिळनाडूतील ट्रकचालक आरोकीयासामी अमालोरपवनाथन हा ट्रक भरधाव वेगाने चालवत होता. चालकाचे नियंत्रण सुटल्याने ट्रकने कारच्या उजव्या बाजूस जोरदार धडक दिली. धडकेमुळे कारचे दोन्ही दरवाजे मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झाले.

याप्रकरणी बोरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, भारतीय न्याय संहितेच्या कलमांसह मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली आहे. पुढील तपास सुरू आहे.

# लाडक्या गणरायाचे आज आगमन

पान १ वरुन पडदे, तोरणे, ग्रीन मॅट, फायकस पट्टे, पानांचे शेड, फुलदाण्या यांसह विविध सजावटीच्या वस्तूंना मोठी मागणी होती. तयार मखरांबरोबरच विविध साहित्य खरेदी करून स्वतःच्या कल्पनेनुसार सजावट करण्यासही नागरिकांकडून पसंती मिळत होती.

गणेशोत्सवातील रोषणाईसाठी विविध रंगांच्या आणि आकर्षक डिझाइनच्या विद्युत माळा बाजारात उपलब्ध आहेत. घर, बाल्कनी तसेच गणेश मंडपासाठी लायटिंग खरेदी करण्यासाठी विद्युत साहित्याच्या दुकानांमध्येही मोठी गर्दी होती. रंगीबेरंगी रोषणाईमुळे बाजारपेठेतील दुकानेही झगमगून गेली होती.

# विट्यात भटक्या कुत्र्यांची दहशत

## पिसाळलेल्या कुत्र्याने महिला व पुरुषाचा घेतला चावा ;कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी

**विटा/ प्रतिनिधी:–**

विटा हद्दीत बजरंगनगर येथे एका पिसाळलेल्या कुत्र्याने एक महिला व एका पुरुषाचा चावा घेतल्याची घटना घडली. विटा परिसरात भटक्या कुत्र्यांचा वावर वाढला असून सर्वसामान्य नागरिकांना जीव मुठीत घेऊन राहावे लागत आहे. विटा नगरपालिकेने भटक्या कुत्र्यांचा प्रश्न मार्गी लावण्याची मागणी विटेकरांकडून होत आहे.

विट्यातील पारे रोड, बजरंगनगर येथे भटक्या कुत्र्यांनी उच्छाद मांडला असून एका पिसाळलेल्या कुत्र्याने एक महिला व पुरुषाला चावा घेतल्यामुळे पायावर जखमा झाल्या आहेत. नागरिकांनी पिसाळलेल्या कुत्र्यापासून दोघांची सुटका केली असून त्यांना ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. विटा नगरपालिकेच्या डॉग स्काडमधील कर्मचारी कुत्र्यांना पकडून नेतात, परंतु ही कुत्री शहरात परत येतात, असे आढळून आले आहे.

शहरात शाळेची मुले ये - जा करतात, वृद्ध पुरुष- महिला रस्त्याने चालतात, त्यामुळे भटक्या कुत्र्यांपासून नागरिकांना धोका आहे. शहरातील भटक्या कुत्र्यांना पकडल्यानंतर कुठे सोडले जाते, हे अनेकांना माहीत नाही. मात्र, सोडलेली कुत्री शहरात परत येत असल्याची प्रतिक्रिया अनेक नागरिकांनी दिली. कुत्र्यांना पकडणार्या ठेकेदाराची चौकशी नगरपालिका प्रशासनाने करावी, अशी मागणीही नागरिकांनी केली आहे.


## विटा नगरपरिषद, विटा

स्वच्छ सर्वेक्षण

# पर्यावरणपूरक गणेशोत्सव स्पर्धा

- २०२६ -







मा. श्री. सुहास (भैय्या) बाबर (आमदार, खानापूर विधानसभा)

मा. सौ. काजलताई म्हेत्रे (नगराध्यक्षा)

मा. श्री. अमोल (दादा) बाबर (उपनगराध्यक्ष)

मा. श्री. भालचंद्रभैय्या कांबळे (आरोग्य सभापती)

स्वच्छ सर्वेक्षण 2026-27 व माझी वसुंधरा अभियान 7.0 अंतर्गत विटा शहरातील सर्व नागरिक व सार्वजनिक गणेश मंडळासाठी पर्यावरणपुरक गणेशोत्सव स्पर्धेचे आयोजन करण्यात येत आहे.

### मूल्यांकनाचे निकष

1) **पर्यावरणपूरक गणेश मूर्ती असावी.**
2) पर्यावरणपूरक सजावट करावी.
3) **स्वच्छ व हरीत परिसर असावा.**
4) स्वच्छता, वृक्षारोपण, पर्यावरण संवर्धन सामाजिक प्रबोधन इ.विषयावर देखावा/ सजावट करावी.
5) सेल्फी विथ इको फ्रेंडली बाप्पा चे आयोजन करावे.
6) माझी वसुंधरा हरित शपथ घ्यावी.
7) **श्रींचे पर्यावरणपुरक पद्धतीने विसर्जन करावे.**
8) परिसरामध्ये निर्माण होणारा कचरा वर्गीकृत असावा.
9) **निर्मल्याचा वापर खत निर्मिती करिता करावा** किंवा निर्माल्याचे पर्यावरण पद्धतीने व्यवस्थापन करावे.
10) इतर सामाजिक शैक्षणिक सेवाभावी उपक्रम करावे.
11) स्पर्धेमध्ये प्रवेश विनामूल्य आहे.
12) उपक्रमांचे फोटो व्हिडिओ **श्री. प्रमोद भोसले 9545716069** या व्हाट्सअप क्रमांकावर पाठवावे.
13) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील स्पर्धेत बदल करण्याचा अधिकार विटा नगरपरिषद विटा यांना असेल.

### पर्यावरणपूरक घरगुती गणेशोत्सव स्पर्धा २०२६

**पारितोषिके**

**प्रथम क्रमांक :** रु. ३,०००/- सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
**द्वितीय क्रमांक :** रु. २,०००/- सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
**तृतीय क्रमांक :** रु. १,०००/- सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
**उत्तेजनार्थ :** रु. ७००/- सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
**उत्तेजनार्थ :** रु. ५००/- सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

**प्रवेश मोफत**

### पर्यावरणपूरक सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धा २०२६

**पारितोषिके**

**प्रथम क्रमांक :** रु. ११,०००/- सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
**द्वितीय क्रमांक :** रु. ७,०००/- सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
**तृतीय क्रमांक :** रु. ५,०००/- सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
**उत्तेजनार्थ :** रु. १०००/- सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र
**उत्तेजनार्थ :** रु. १०००/- सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र

**नाव नोंदणी संपर्क :** श्री. प्रमोद भोसले 9545716069, श्री. महेश झाडे 7083848385

**स्वच्छ सर्वेक्षण विभाग, विटा नगरपरिषद विटा**

**श्री. विक्रमसिंह पाटील**
मुख्याधिकारी,
विटा नगरपरिषद विटा

**मा. सौ. काजलताई म्हेत्रे**
नगराध्यक्षा,
विटा नगरपरिषद विटा




# रेणावी घाटात भरधाव कारची दुचाकीला धडक; एकाचा मृत्यू, एक जखमी

**विटा / प्रतिनिधी:–**

रेणावी घाटातील सिमेंट कॉंक्रीटच्या वळणावर समोरून येणाऱ्या कारने रॉंग साईडला जाऊन दुचाकीला जोरदार धडक दिल्याने झालेल्या अपघातात एकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. हा अपघात शनिवार, दि. १२ सप्टेंबर रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास घडला.

याबाबत निलेश प्रकाश पाटील (वय ३०, व्यवसाय टायपिंग ऑपरेटर, सध्या रा. रेणावी, ता. खानापूर, मूळ रा. बलगवडे, ता. तासगाव) यांनी विटा पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. या अपघातात गंभीर जखमी झालेले राहुल गौरव यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यानुसार मनिष नरेंद्र मुळीक (रा. हणमंतनगर, विटा) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निलेश पाटील व त्यांचे मित्र राहुल सिद्धेश्वर गुरव (वय ३५, रा. रेणावी) हे हिरो स्प्लेंडर दुचाकीवरून रेणावीहून विट्याकडे कामासाठी जात होते. रेणावी घाट उतरून सिमेंट कॉंक्रीटच्या वळणावर आले असता समोरून येणाऱ्या हुंडाई आय १० कारने आपली बाजू सोडून रॉंग साईडला येत दुचाकीला धडक दिली.

या अपघातात निलेश पाटील यांच्या उजव्या पायाला फ्रॅक्चर झाले असून डोळा व हातास दुखापत झाली. राहुल गुरव यांच्या डोक्याला, छातीला व पायाला गंभीर दुखापत झाली. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

याप्रकरणी बीएनएसच्या विविध कलमांसह मोटार वाहन कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोउपनि आकाश शिंदे करीत आहेत.